# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली दि. २१/०९/२०१७

## पोलीसांच्या मदतीने गुर्जा गावातील लोकांनी तोडले नक्षल स्मारक

नक्षल्यांकडून २८ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान पाळण्यात येणाऱ्या नक्षल बंद दरम्यान अहेरी तालुक्यातील उपपोस्टे पेरमिली हद्दीतील गुर्जा या गावात नक्षल्यांनी स्मारक उभारले होते. दरम्यान गुर्जा गावातील लोकांनी उपपोस्टे पेरमिली येथे याबाबत माहिती दिल्यानंतर दिनांक १७/०९/२०१७ रोजी उपपोस्टे पेरमिली पोस्ट पार्टीने नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना गुर्जा गावातील लोकांच्या सहभागाने उभारण्यात आलेले नक्षल स्मारक तोडले. गावकऱ्यांनी आपला नक्षल विरोधात प्रचंड असंतोष दर्शवित गावाच्या बाहेर उभारण्यात आलेले नक्षल स्मारक तोडण्यात स्वयंस्फुर्त सहभाग नोंदवला. यापुढे नक्षलवादयांना आता आम्ही कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद देणार नाही व जिल्हयातुन नक्षलवादयांचे समुळ उच्चाटन करण्याचा निर्धार आदिवासी बांधवानी केला. त्याचबरोबर नक्षल्यांच्या नाहक त्रासाला कंटाळलेल्या आदिवासींनी नक्षल गावबंदी करण्याचा निर्णयही घेतला आहे.

